# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/registrar@unigug.ac.in


जा.क्र. /गोंविग/कुसका/ ६१९१ /२०२६ दि. ०४/०९/२०२६

**प्रति,**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:** - दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या आयोजित राज्यस्तरीय महाकुंभ रोजगार मेळावासाठी आपल्याकडील उमेदवारांना सदर मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना सुचना देणेबाबत.

**संदर्भ** :- १) Governor's secretariat, Lok bhavan, Malabar Hill, Mumbai यांचे पत्र क्रं. - RB/Edn. १ /Gen-२०२६ CR-१५८/८५६.
२) जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/१६०८-९, दि. ०१/०९/२०२६

महोदय,

वर उल्लेखीत विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, संलग्नीत पत्रानुसार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांच्याव्दारे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिनांक २९/०९/२०२६ रोजी आयोजित मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना सुचना देण्याबाबत संदर्भीय पत्र क्रं. २ प्राप्त झालेले असून सदर संलग्न पत्राचे अवलोकन करुन आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही घेण्यात यावी.

धन्यवाद !

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र- कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,

शासकीय संकुल बॅरेक क्रमांक-२ युनिट क्रं-२,कॉम्प्लेक्स,गडचिरोली-४४२६०५

ई-मेल : asstdiremp.gadchiro i@ese.maharashtra.gov.in/gadchirolirojgar@gmail.com

Webside :-http://www.mahaswayam.gov.in Phone:-07132-222368

जाक्रं/जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/1605 /२०२६ .दिनांक . ०१, सप्टेंबर ,२०२६.

प्रति,

मा.कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय :- दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आयोजित "राज्यस्तरीय महाकुंभ रोजगार मेळावा"साठी आपल्याकडील उमेदवारांना सदर मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी ऑनलाईन फॉर्म भरण्याकरीता आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना सुचना देणेबाबत.

संदर्भ :- १. मा.ना.श्री.मंगलप्रभात लोढा, मा.मंत्री कौशल्य विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक ०५७९/२०२६ दिनांक.१३.०८.२०२६.

२. मा.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक.१४.०८.२०२६ आणि दि.१९.०८.२०२६ रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील निर्देश.

३. आयुक्तालय नवी मुंबई, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, यांचेकडून दिनांक.१.०९.२०२६ रोजीचे प्राप्त लिंक.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून, त्यांनी सदैव जपलेल्या " युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती " या संकल्पनेला अनूसरून या विभागामार्फत एक महत्वपुर्ण उपक्रम हाती घेतले आहे. दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजी संपुर्ण राज्यात एकाच दिवशी, एकाच वेळी ५०० ठिकाणी रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करून राज्याच्या रोजगार क्षेत्रात एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे. राज्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मूळ गाभा असून हा उपक्रम राज्यातील प्रत्येक जिल्हा,तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यांत येत आहे.

त्यानुषंगाने गडचिरोली जिल्हयामध्ये १) शिवाजी महाविद्यालय,गडचिरोली २) महात्मा गांधी कला , विज्ञान महाविद्यालय,आरमोरी, ३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( ITI ) वडसा., ४) शहीद बिरसामुंडा महाविद्यालय, कोरची ५) शिवाजी ज्युनिअर कॉलेज ,चामोर्शी, ६) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) आलापल्ली, ७) भगवंतराव आटर्स ॲण्ड सायन्स कॉलेज , एटापल्ली ८) श्री.जीवनराव सिताराम पाटील मुनघाटे आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज , धानोरा या सर्व तालुक्यामध्ये मंगळवार दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजी एकाच दिवशी रोजगार मेळावे अथवा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यांत येत आहे. सदर रोजगार मेळाव्यामध्ये विविध ठिकाणांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून त्यांच्या उपलब्ध रिक्त पदांसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून पात्र उमेदवारांना तात्काळ रोजगार उपलब्ध करून दिले जाणार आहे.

त्याकरीता गरजू उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य मिळावे, या उददेशाने आपल्या व आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण उमेदवारांसाठी सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यांत येत आहे.

याकरीता बेरोजगार व इच्छुक उमेदवारांसाठी गुगल फार्म तयार करण्यांत आलेला आहे. तरी , आपल्या व आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील सर्व इच्छुक उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण उमेदवारांनी अनिवार्यपणे भरावा, याबाबत आपण आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना आवश्यक सूचना देण्यांत याव्यात .

तसेच दिनांक. २९ सप्टेंबर २०२६ रोजी उमेदवारांनी वरील नजिकच्या रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी सहभागी व्हावे याबाबतच्या सूचना आपल्या व आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना देण्याची आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत येत आहे.

करिता तात्काळ कार्यवाहीस्तव सोबत उमेदवार रोजगार मेळाव्याकरीता सहभाग नोंदविणेकरीता गुगल फॉर्म लिंक खालीलप्रमाणे https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7

उमेदवार रोजगार मेळाव्याकरीता सहभाग नोंदविणेकरीता वरील लिंकचे QR Code -खालीलप्रमाणे-

Job Seeker

आपला,

( रा.ना.माटे)
सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र,गडचिरोली.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर :-

मा.उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय,नागपूर.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

# रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र

# २०२६

Job Seeker




**राज्यव्यापी रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सहभागी होण्यासाठी नोकरीइच्छुक उमेदवारांनी भरावयाचा नोंदणी अर्ज**

**(Job Seeker Registration Form)**

**नोंदणी अर्जामध्ये आवश्यक प्राथमिक माहिती अचूकपणे भरावी.**